# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# छळणाऱ्यापासून धर्मोपदेशकापर्यंत


लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen


60 गोष्टींतील 58 (पहिली)


**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi



प्रारंभीच्या मंडळीत परमेश्वराने त्याच्या लोकांच्याकर्वी महान कार्य केले. फिलिप्प नावाचा एक मनुष्य होता,

तो गर्दीने भरलेल्या यरुशलेमेत लोकांना येशूची सुवार्ता सांगण्यास व्यस्त होता. परंतू देवाने त्याला रानात पाठविले. का ?

1



कुशी (एथिओपियन) लोकांची राणी कांदके, हिचा मोठा अधिकारी त्या रानाच्या वाटेने प्रवास करित होता, हे देवाला माहित होते. तो त्याच्या घरि परतत असतांना वाटेत एक विशेष पुस्तक वाचित होता. ते पुस्तक कोणते असेल; कोणी ओळखू शकेल का?

2


जेंव्हा
फिलिप्पने
देवाचे आज्ञापालन
केले, तेंव्हा देवाने त्याला
त्या अधिकाऱ्याजवळ नेले;
तो ते पुस्तक न समजताच वाचत
होता. त्या अधिकाऱ्याने फिलिप्पला
त्याच्याजवळ येऊन बसण्यास सांगितले.
3


"याचा अर्थ काय आहे?" असे त्या
अधिकाऱ्याने फिलिप्पला विचारले.
तो रथ त्या रानाच्या रस्त्यावरुन झटके
देत पुढे चालला असता, फिलिप्पाने
बोलायला सुरवात केली व तो वाचत
असलेल्या शास्त्राभागापासून सुरवात
करुन त्याने त्याला
येशूची सुवार्ता
सांगितली.
4


येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे,
या पवित्र शास्त्रातील संदेशावर आफ्रिकन
अधिकाऱ्याने लवकरच विश्वास ठेवला. ते
पाणवठ्याजवळ आले तेंव्हा तो अधिकारी म्हणाला,
"बाप्तिस्मा घेण्यास मला काय हरकत आहे?"
5


मग फिलिप्पने म्हटले, "जर तूं पूर्ण अंतःकरणाने विश्वास करतो तर तुला
बाप्तिस्मा घेण्यास काही हरकत नाही." त्यावर तो अधिकारी म्हणाला की,
"येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे यावर मि विश्वास
करतो." फिलिप्प त्याला घेऊन पाण्यात
उतरला व त्याने त्याला बाप्तिस्मा दिला.
6


जेंव्हा ते पाण्यातून वर आले, तेंव्हा
प्रभूचा आत्मा फिलिप्पाला घेऊन
गेला, म्हणून पुन्हा तो त्या आफ्रिकन
अधिकाऱ्याच्या दृष्टिस पडला नाही.
एथिओपियाला तो आनंद करित
परतला.
7


परंतू काही लोक ख्रिस्ती लोकांचा व्देष करित होते. फिलिप्पचा एक मित्र,
स्तेफन याला क्रोधाविष्ट जमावाने दगडमार करुन जिवे मारले होते कारण त्याने
येशूविषयी दुसऱ्यांना सांगू नये अशी त्यांची इच्छा होती. तार्सस गावातील शौल
नावाच्या एका माणासाने स्तेफनला जिवे मारण्यास मदत केली होती. शौल सर्व
ख्रिस्ती लोकांचा छळ करित होता.
8


शौल, ख्रिस्ती लोकांना धमक्या देणे व
त्यांना जिवे मारणे ह्यांविषयीचे फूत्कार
टाकीत होता. तो प्रमुख याजकाकडे गेला
आणि जे स्त्री-पुरुष येशूचे अनुकरण
करतात त्यांना धरुन अटक करण्याचे
अधिकार पत्र मागितले.
9


बिच्चारा तार्ससकर
शौल ! तो देवाच्या
लोकांना त्रास देत
आहे म्हणजे तो खुद्द
येशूलाच त्रास देत
आहे हे त्याला माहित
नव्हते. देवाने शौलाला
थांबवणे आवश्यक
होते. परंतू कसे?
10


देवाने शौलाला "पकडले" !
जेंव्हा शौल दिमिष्क शहराच्या
वाटेवर होता, देवाने स्वर्गातून
मोठा प्रकाश पाडला. शौल
त्या प्रकाशाने जमिनिवर
पडला. मग त्याने एक
वाणी ऐकली.
11


तेंव्हा शौल मोठ्याने म्हणाला, "प्रभो, तूं कोण आहेस?"
त्याने म्हटले, "ज्या येशूचा तूं छळ करितोस तोच मी
आहे." थरथर कांपत, विस्मयीत झालेल्या शौलाने
विचारले, "प्रभू, आता मी करावे अशी तुझी इच्छा आहे?"
आणि प्रभूने त्याला म्हटले, "तर आता ऊठ व नगरांत जा,
म्हणजे तूं काय करावयाचे आहे हे तुला सांगण्यात येईल."
12


शौलासंगती असलेल्या
माणसांनी वाणी ऐकली,
परंतू त्यांना काही दिसले
नाही. शौल जमिनीवरुन
उठला व त्याला कळले
की तो आंधळा बनलेला
होता ! ते त्याला घेऊन
दिमिष्कात गेले.
13


तेथे शौल तिन दिवस पर्यंत जेवण पाणी
न घेता आंधळा बनून राहिला. कदाचित
त्याने ज्या देवाने त्याला दिमिष्काच्या
रस्त्यावर दर्शन दिले त्या प्रभू
येशूची प्रार्थना करण्यात त्याचा
वेळ घालवला असावा.
14













छळणाऱ्यापासून धर्मोपदेशकापर्यंत

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित ८-९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!